# 'उद्योजकता ते संगणक क्षेत्र' (23/07/2020)

नवीन व्यावसायिक कौशल्येअंगीकारणेआवश्यक: विवेक सावंत बदलत्या काळानुसार पारंपरिक शिक्षण पद्धती बदलत असून, त्यामुळेडिजिटल शिक्षणाला प्रोत्साहन देणेगरजेचे आहे. तसेच करिअरची संधी शोधत असताना सरकारी किंवा कायमस्वरूपी नोकरी या परिभाषा बदलत असून, स्पर्धेच्या युगामध्येटिकू न राहण्यासाठी युवकांनी जास्तीत जास्त नवीन व्यावसायिक कौशल्येअंगीकारणेगरजेचे आहे, असेमत महाराष्ट्र ज्ञान मंडळाचेअध्यक्ष मा. विवेक सावंत यांनी व्यक्त के ले. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा. अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त पुणेजिल्हा शिक्षण मंडळातर्फे२२ ते२७ जुलैया कालावधीमध्येआयोजित अनंत व्याख्यानमाले मध्ये 'उद्योजकता तेसंगणक क्षेत्र' या विषयावर दुसरेपुष्प गुंफताना तेबोलत होते. यावेळी माजी खासदार वंदनाताई चव्हाण, पुणेजिल्हा शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव अॅड. संदीप कदम, खजिनदार अॅड. मोहनराव देशमुख, उपसचिव श्री. एल. एम. पवार, सहसचिव (प्रशासन) श्री. ए. एम. जाधव उपस्थित होते. व्याख्यानमालेचेप्रास्ताविक करत असताना पुणेजिल्हा शिक्षण मंडळाचेमानद सचिव अॅड. संदीप कदम म्हणाले कि, नव्या शैक्षणिक वर्षामध्येडिजिटल शिक्षणाला प्रोत्साहन देणेगरजेचेआहे. त्यामुळे डिजिटल शिक्षणाशी संबंधित विविध घटक व तंत्रज्ञानाची इत्यंभूत माहिती विद्यार्थी, शिक्षक व पालकांना मिळावी या उद्देशानेमाहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील जागतिक पातळीवरचेतज्ञ मा. विवेक सावंत यांचेव्याख्यान आयोजित केल्याचेसांगितले. तसेच भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या शिक्षण संदर्भातील प्रसिद्ध विधानाचा संदर्भ देत प्रत्येकानेआयुष्यामध्येशेवटपर्यंत स्वतःला विद्यार्थीच समजत नेहमी काही तरी नवीन शिकण्याचा प्रयत्न के ला पाहिजेअसेआवाहन के ले. आजच्या व्याख्यानासाठी प्रमुख व्याख्यातेम्हणून उपस्थित राहिलेलेमा. विवेक सावंत यांनी सर्वप्रथम भारताचे माजी कृषिमंत्री आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या मार्गदर्शनानेव प्रेरणेनेयशस्वी झाल्याचेनमूद करत नव्या महाराष्ट्राच्या उभारणीमध्येपवार साहेबांचेअतुलनीय योगदान असल्याचेसांगितले. तसेच करिअर म्हणजे काय, डिजिटल शिक्षण म्हणजेकाय, शिक्षणा मधून समाजाला काय अभिप्रेत आहे, नवीन तंत्रज्ञानाधारित कौशल्ये कशी आत्मसात करता येतील या घटकांवर प्रकाश टाकत ग्राफिक डिझायनिंग, सोशल मीडिया मॅनेजमेंट, थ्रीडी प्रिंटिंग, कं टेंट राइटिंग, ई - कॉमर्स, ई - अकाउं ट, वेब डेव्हलपमेंट, मोबाईल अॅप डेव्हलपमेंट अशा फ्री - लेन्सिंग मधील विविध पैलूवर सादरीकरणासह सविस्तर भाष्य के ले. व्याख्यानानंतर डिजिटल शिक्षण, ग्रामीण भागामध्येडिजिटल शिक्षणासाठी येणाऱ्या मर्यादा व त्यावरील उपाय, कृत्रिम बुद्धिमत्तेमुळेव्यवसायातील घटत असलेल्या मनुष्यबळाचेप्रमाण व भविष्यातील रोजगाराच्या संधी यावरील प्रश्नावर अतिशय सविस्तर व अभ्यासपुर्णउत्तरेदेत उपस्थितांचेशंका निरसन के ले. यावेळी प्राचार्यडॉ. संजय खरात व प्राचार्यडॉ. के. सी. मोहितेयांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचेसूत्रसंचालन डॉ. माया माईनकर, आभार प्रदर्शन प्राचार्याडॉ. सुषमा भोसलेयांनी के लेतर पाहुण्यांचा परिचय प्राचार्यडाॅ. पंडित शेळके यांनी करुन दिला. व्याख्यानाच्या संयोजनासाठी व यशस्वितेसाठी पुणेजिल्हा

शिक्षण मंडळाच्या सर्वसन्माननीय पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्यडॉ. नितीन घोरपडे, प्राचार्यडॉ. अशोक भोसले, प्राचार्याडॉ. रागिणी पाटील, प्राचार्यडॉ. बाळकृष्ण झावरे, प्राचार्यडॉ. पंडित शेळके, प्राचार्यडॉ. तानाजी साळवे, प्राचार्याडॉ. सुषमा भोसले, प्राचार्याडाॅ. शर्मीला चौधरी, प्राचार्य डॉ. अभय खंडागळे, प्राचार्य डॉ. तुषार शितोळे तसेच सिताराम अभंग, किरण देशपांडे, संतोष पठारेयांनी परिश्रम घेतले. सदर ऑनलाइन व्याख्यानामध्ये मध्ये झुम ॲप तसेच यु - ट्युब लिंक चा वापर करुन ७०० पेक्षा जास्त शिक्षणप्रेमीनी या राष्ट्रीय वेबिनार मध्येसहभाग घेतला